सातारा, शनिवार, २ सप्टेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# सायकल मिळाल्याने थांबली पायपीट!

## 'डीपी'त पारधी समाजातील विद्यार्थिनीला भेट; माजी विद्यार्थ्याची मदत

काही सुखद



कोरेगाव : दीपा काळे यांच्याकडे सायकल सुपूर्त करताना डॉ. विजयसिंह सावंत, डॉ. मोहन राजमाने, डॉ. चंद्रकांत खिलारे, डॉ. सुरेश साळुंखे, प्रा. बाळकृष्ण भोसले, संदीप संकपाळ.

**कोरेगाव, ता. १ :** नेव्हीमध्ये भरती झालेल्या येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या 'कॅडेट'ने आपल्या पहिल्या पगारातून दिलेल्या दहा हजारांच्या मदतीतून पारधी समाजातील विद्यार्थिनीला सायकल भेट देण्यात आली. एका माजी विद्यार्थ्याने दिलेल्या या योगदानामुळे उपेक्षित घटकातील विद्यार्थिनींच्या शिक्षणाला आधार मिळाला.

या महाविद्यालयात पारधी कुटुंबातील दीपा अजमेर काळे या वाणिज्य शाखेचे शिक्षण घेत आहेत. दीपा या विवाहित असून, त्यांना चार महिन्यांचे बाळ आहे. या बाळाला झोपडीत ठेवून त्या शिक्षणासाठी महाविद्यालयात येतात. महाविद्यालयातील अध्ययनानंतर बाळाच्या ओढीने त्या कधी चालत, तर कधी धावत घराकडे जातात. शिक्षण आणि मातृत्व अशा दुहेरी ओढीने अस्वस्थ करायला लावणारी तिची रोजची धडपड क्रीडा शिक्षक व 'एनसीसी'चे प्रमुख प्रा. बाळकृष्ण भोसले यांच्या निदर्शनास आली.

संदीप संकपाळ हा नुकताच नेव्हीमध्ये भरती झाला आहे. त्याने पहिल्या पगारातील दहा हजारांची रक्कम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेकडे सुपूर्द केली. या रकमेतून दीपा यांना प्राचार्य व संस्थेचे सहसचिव डॉ. विजयसिंह सावंत, डॉ. मोहन राजमाने, डॉ. चंद्रकांत खिलारे, डॉ. सुरेश साळुंखे यांच्या हस्ते सायकल भेट देण्यात आली. त्यामुळे दीपा यांची रोजची पायपीट कमी होण्यास मदत होईल.